आकाशवाणी पुणे
प्रादेशिक वृत्त विभाग
प्रादेशिक बातमीपत्र
सकाळी 07 वाजून 10 मि

दिनांक:30.05.2024 वार:गुरुवार

---

- लोकसभा निवडणुकीच्या अंतिम सातव्या टप्प्यातील प्रचार आज थंडावणार
- विधान परिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाची निवडणूक जाहीर
- आर्थिक वर्ष 2023-24 च्या चौथ्या तिमाहीत भारताचा सकल देशांतर्गत उत्पादन वाढीचा दर सात पूर्णांक चार दशांश टक्के राहण्याचा स्टेट बँकेचा अंदाज
- रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या शाळांमधील 20 विद्यार्थ्यांची नासा भेटीसाठी निवड आणि
- केरळमध्ये येत्या २४ तासात मॉन्सूनचं आगमन.

निवडणूक-

लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि अंतिम टप्प्यासाठीचा प्रचार आज थंडावणार आहे. या टप्प्यात सात राज्य आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या ५७ मतदारसंघांसाठी येत्या एक जून रोजी मतदान होणार आहे. या सर्व मतदारसंघांमध्ये प्रचार शिगेला पोहोचला आहे.

दरम्यान, लोकसभा निवडणुकीच्या शनिवारी पार पडलेल्या सहाव्या टप्प्यातल्या मतदानाची आकडेवारी निवडणूक आयोगानं जाहीर केली. या टप्प्यात ५८ मतदारसंघांमध्ये ६३ पूर्णांक ३७ शतांश टक्के मतदान झाल्याची माहिती आयोगानं दिली आहे.

शिक्षक-पदवीधर निवडणूक

निवडणूक आयोगानं महाराष्ट्र विधानपरिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाची निवडणूक जाहीर केली आहे. मुंबई पदवीधर, कोकण विभाग पदवीधर, नाशिक विभाग शिक्षक तसंच मुंबई शिक्षक मतदारसंघ अशा ४ जागांकरिता निवडणूक होत असून सोमवार, २६ जून रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीसाठी शुक्रवार, ३१ मे रोजी अधिसूचना जारी करण्यात येईल. उमेदवारांना ७ जून पर्यंत अर्ज दाखल करता येईल. 10 जून रोजी अर्जांची छाननी होणार असून, 12 जूनपर्यन्त उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहेत. 1 जुलै मतमोजणी होणार आहे.

मतदान टक्केवारी

नुकत्याच झालेल्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत, मतदानाचं प्रमाण 2019 च्या तुलनेत अधिक प्रमाणात होण्यासाठी प्रयत्न करावेत, मतदानाची टक्केवारी कमी होणार नाही याची खबरदारी घ्यावी, असे निर्देश केंद्रीय निवडणूक आयोगाने दिले होते. महाराष्ट्रातील मतदानाच्या  आकडेवारीत ही दोन्ही उद्दिष्ट साध्य झाल्याची माहिती मुख्य राज्य निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत देण्यात आली आहे. या वेळी पाच टप्प्यात झालेल्या निवडणुकीत, एकंदर ६१ पूर्णांक 33 शतांश टक्के मतदान झालं. २०१९ च्या लोकसभा निवडणूकीत ही  टक्केवारी  ६० पूर्णांक ७१ शतांश टक्के होती.

मतमोजणी

येत्या ४ जून रोजी होत असलेल्या लोकसभा निवडणूक मतमोजणीसाठी पुणे जिल्हा प्रशासनाकडून नियोजन पूर्ण करण्यात आलं असून त्यानुसार शिरूर  लोकसभा मतदारसंघात सर्वाधिक म्हणजे २७ फेऱ्या होणार आहेत. पुणे शहर जागेसाठी २० ते २१, बारामतीसाठी २१ ते २४ तर मावळ जागेसाठी २३ ते २५ फेऱ्या होण्याची शक्यता आहे.

VC – शिक्षण आराखडा

इंट्रो- इयत्ता तिसरी ते १२ वीपर्यंतचा पाठ्यक्रम तयार करण्यासाठी शालेय शिक्षण राज्य अभ्यासक्रम आराखड्याचा मसुदा तयार करण्यात आला असून राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात आला आहे.  या मसुद्याबाबत सर्व समाज घटक, शिक्षक, पालक, शिक्षण तज्ञ, शैक्षणिक प्रशासन यांनी ३ जूनपर्यंत आपले अभिप्राय नोंदवावेत असं आवाहन परिषदेच्या वतीनं करण्यात आलं आहे. याविषयी अधिक माहिती देणारा हा वृत्तांत...

स्क्रिप्ट –

शिक्षण मनुष्याच्या सर्वांगीण विकासात मोलाची भूमिका बजावत असतं. नव्याने तयार करण्यात येत असलेला पाठ्यक्रम यासाठीच महत्वाचा आहे. या पाठ्यक्रमांद्वारे बदलत्या जगाची आव्हाने पेलण्यासाठी मानवी मूल्य, जीवन कौशल्य आणि नैतिकतेवर आधारित तार्कीक विचार करणारं  शिक्षण दिलं जाणार आहे. प्रचलित विषयांसोबतच आरोग्य, कला, व्यवसाय शिक्षण या विषयांनाही  विशेष महत्त्व देण्यावर भर देण्यात येणार आहे, जेणेकरून, विज्ञाननिष्ठ पुराव्यावर आधारित चिकित्सक विचार करण्याची वृत्ती विकसीत होईल.  आशयाचे ओझे कमी करुन खालील संकल्पना आणि  महत्त्वाच्या क्षमता मूल्ये कौशल्य विकसित होतील यावर या आराखड्यामध्ये भर देण्यात आला आहे. हा आराखडा तयार करताना राष्ट्रीय अभ्यासक्रम आरखाद्यातील तरतुदी विचारात घेण्यात आल्या असून त्यामध्ये महाराष्ट्र राज्याच्या  अनुषंगाने अंशत: बदल करण्यात आले आहेत. जसं की, पहिली ते दहावी मराठी आणि  इंग्रजी भाषा अनिवार्य, सहावीपासून हिंदी, संस्कृत व अन्य भारतीय, परदेशी भाषा शिकण्याचा पर्याय, तिसरी आणि नववी पासून व्यावसायिक आणि नावीन्यपूर्ण शिक्षणाचा पर्याय याद्वारे विद्यार्थ्यांना उपलब्ध होतील. मूळ भारतीय प्राचीन ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे, सांविधानिक तसंच  मानवी आणि  नैतिक मूल्यांची जोपासना, शाळांमध्ये शारीरिक आणि मानसिक

आरोग्याबाबत मार्गदर्शन, असं सर्वसमावेशक शिक्षण देऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास  या नवीन पाठ्याक्रमांद्वारे साधला जाऊ शकेल. आकाशवाणी बातम्यांसाठी, सविता म्हसकर, पुणे

विकासदर

स्टेट बँक ऑफ इंडियानं आर्थिक वर्ष 2023-24 च्या चौथ्या तिमाहीत भारताचा सकल देशांतर्गत उत्पादन वाढीचा दर सात पूर्णांक चार दशांश  टक्के राहण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. याच आर्थिक वर्षात सकल देशांतर्गत उत्पादन वाढीचा दर आठ टक्क्यांपर्यंत पोहोचू शकतो असंही बँकेनं जारी केलेल्या आर्थिक संशोधन विभागाच्या अहवालात म्हंटलं आहे. हा अहवाल भारतातील शहरी आणि ग्रामीण भागात सातत्यानं होत असलेल्या विकसनशीलतेला  अधोरेखित करणारा आहे. प्रवासी वाहन विक्री, विमान प्रवासी वाहतूक, वस्तू आणि सेवा कर संकलन, क्रेडिट कार्ड व्यवहार, पेट्रोलियम वापर आणि पथकर संकलन यातील भक्कम कामगिरीवरून शहरात होत  असलेल्या आर्थिक वृद्धीचे संकेत मिळत आहेत, तर,  दुसरीकडे, डिझेलचा वापर आणि दुचाकींची विक्री वाढल्यानं ग्रामीण आर्थिक निर्देशांकही सकारात्मक कल दाखवत आहे.

S/B-नाशिक-एव्हरेस्ट

नाशिकच्या महाराष्ट्र पोलीस अकादमीमध्ये पोलीस निरीक्षक पदावर कार्यरत असणाऱ्या द्वारका डोके यांनी  22 मे या दिवशी एवरेस्ट पर्वतावर यशस्वी चढाई केली. या उत्तुंग कामगिरीसाठी केलेल्या तयारीविषयी द्वारका डोके यांनी सांगितलं...

राजीव गांधी शेतकरी पुरस्कार

फळबाग उत्पादक महिला शेतकरी डॉक्टर भाग्यश्री पाटील यांना सन २०२४ चा राज्यस्तरीय राजीव गांधी कृषिरत्न पुरस्कार जाहीर झाला होता. दौंड इथं त्यांच्या शेतीच्या बांधावर जाऊन हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.  डॉक्टर भाग्यश्री पाटील यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करून माळरानावर छत्तीस हजार झाडांद्वारे नंदनवन फुलवलं आहे. ठिबक सिंचनाच्या साह्यानं केशर आंब्याचं सेंद्रीय निर्यातक्षम उत्पादन घेण्यासाठी काटेकोर नियोजन आंतरराष्ट्रीय मानांकन पूर्ण केल्यामुळं परदेशामध्ये  या आंब्याची आणि डाळिंबाची निर्यात केली जाते.

रत्नागिरी

रत्नागिरी जिल्हा परिषदेच्याशाळांमध्ये शिकत असलेल्या २० विद्यार्थ्यांची अमेरिकेतल्या नासा या संस्थेच्या अभ्यास सहलीसाठी निवड झाली आहे. जिल्हा परिषदेनं तीन परीक्षांच्या माध्यमातून २३ हजार विद्यार्थ्यांमधून या विद्यार्थ्यांची निवड केली.  जिल्हा

परिषदेच्या शाळांमधल्या गुणवंत विद्यार्थ्यांना नासा संस्थेत घेऊन जाण्याचं हे दुसरं वर्ष असून, जिल्हा परिषदेमार्फत गुणवान विद्यार्थ्यांना यापूर्वी इस्रोची सहलदेखील घडवण्यात आली आहे.

पालघर-रेलवेसेवा

पालघर रेल्वे स्थानकात मंगळवारी संध्याकाळी मालगाडीचे डबे घसरून झालेल्या अपघातानंतर पश्चिम रेल्वेची वाहतूक हळूहळू पूर्वपदावर येत आहे.  २६ तासांनंतर विरारहून पहिली लोकल काल संध्याकाळी डहाणूकडे रवाना करण्यात आली.

अपघात

सांगली जिल्ह्यातील  मणेराजुरी ते तासगाव रोडवर मंगळवारी  मध्यरात्री प्रवासी कारला झालेल्या अपघातात, एकाच कुटुंबातील सहा जणांचा मृत्यू झाला. रिकाम्या कालव्यामध्ये गाडी पडून हा अपघात झाला. मृतांमध्ये तीन मुली, दोन महिला आणि गाडी चालकाचा समावेश आहे, तर अन्य एक महिला जखमी झाली आहे.

मान्सून-पुल

येत्या २४ तासांत दक्षिण-पश्चिम मान्सून केरळमध्ये दाखल होण्याची शक्यता आहे. भारतीय हवामानशास्त्र विभागानं सांगितलं की, मान्सून एक जून या सामान्य सुरुवातीच्या तारखेच्या दोन दिवस आधी येईल. दक्षिण अरबी समुद्र, मालदीव आणि कोमोरिन, लक्षद्वीप, केरळ आणि बंगालच्या उपसागराच्या आणखी काही भागांमध्ये नैऋत्य मान्सून पुढे जाण्यासाठी परिस्थिती देखील अनुकूल होत आहे अशी माहिती हवामानशास्त्र विभागाचे महासंचालक मृत्युंजय महापात्रा यांनी आकाशवाणीला दिली.

हवामान

कोकणात उष्ण, दमट हवामानाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. तुरळक ठिकाणी पावसाच्या सरी अपेक्षित आहेत. विदर्भात उष्णतेची लाट कायम आहे. ब्रह्मपुरी, चंद्रपूर, वर्धा इथं पारा ४५ अंशांच्या वर आहे.